
Adda247 मराठी

# Weekly Quiz Compilation

## Download Free PDF



**Q.1**

अझरबैजान फॉर्म्युला वन ग्रांड प्रीक्स **2022** कोणी जिंकले आहे?

1. सेबॅस्टियन वेटेल
2. मॅक्स वर्स्टॅपेन
3. चार्ल्स
4. लुईस हॅमिल्टन

**Answer:**

B

**Sol:**

रेड बुलच्या मॅक्स वर्स्टॅपेनने अझरबैजान फॉर्म्युला वन ग्रांप्री 2022 जिंकली (त्याचा हंगामातील पाचवा विजय).

---

**Q.2**

जागतिक अन्न सुरक्षा दिनानिमित्त 'आयुर्वेद आहार' लोगोचे लोकार्पण आरोग्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. भारताच्या आरोग्यमंत्र्यांचे नाव सांगा.

1. धर्मेंद्र प्रधान
2. मनसुख मांडविया
3. प्रल्हाद जोशी
4. वीरेंद्र कुमार

**Answer:**

B

**Sol:**

जागतिक अन्न सुरक्षा दिनानिमित्त आरोग्य मंत्री मनसुख मांडविया यांच्या हस्ते 'आयुर्वेद आहार' लोगोचे लोकार्पण करण्यात आले.

---

**Q.3**

**NASA "DAVINCI** मिशन" नावाची मोहीम सुरू करणार आहे. मिशन शुक्र ग्रहाकडे उड्डाण करेल आणि _______ मध्ये त्याचे कठोर वातावरण एक्सप्लोर करेल.

1. 2025
2. 2026
3. 2027
4. 2029

**Answer:**

D

**Sol:**

NASA "DAVINCI मिशन" नावाची मोहीम सुरू करणार आहे. DAVINCI चा अर्थ आहे "Deep Atmosphere Venus Investigation of Noble Gases, Chemistry and Imaging Mission". मिशन शुक्रावरून उड्डाण करेल आणि 2029 मध्ये त्याचे कठोर वातावरण एक्सप्लोर करेल.

---

**Q.4**

गोपाळ गणेश आगरकर यांचे टोपणनाव काय आहे ?

1. लोकमान्य
2. महात्मा
3. सुधारक
4. महर्षी

**Answer:**

C

**Sol:**

गोपाळ गणेश आगरकर यांचे टोपणनाव सुधारक आहे.

---

**Q.5**

सुबोध रत्नाकर हा काव्यसंग्रह कोणी लिहाला?

1. सावित्रीबाई फुले
2. आनंदीबाई जोशी
3. रमाबाई रानडे
4. यापैकी नाही

**Answer:**

A

**Sol:**

सुबोध रत्नाकर हा काव्यसंग्रह सावित्रीबाई फुले यांनी लिहिला आहे.

**Q.1**

सरकारी अर्थसंकल्प हे वार्षिक आर्थिक विवरण असते जे आगामी आर्थिक वर्षासाठी अंदाजे सरकारी खर्च आणि अपेक्षित सरकारी प्राप्ती किंवा महसूल यांची रूपरेषा देते. या अंदाजांच्या व्यवहार्यतेवर अवलंबून, खालीलपैकी कोणता बजेट प्रकार नाही?

1. अर्थसंकल्प
2. संतुलित बजेट
3. अतिरिक्त बजेट
4. तुटीचे बजेट

**Answer:**

**A**

**Sol:**

दिलेल्या पर्यायांवरून, अर्थसंकल्प हा अर्थसंकल्पाचा प्रकार नाही. भारतीय राज्यघटनेच्या कलम **112** मध्ये भारताच्या केंद्रीय अर्थसंकल्पाला वार्षिक आर्थिक विवरण म्हणून देखील संबोधले जाते.

---

**Q.2**

भारताचा पहिला केंद्रीय अर्थसंकल्प कधी सादर करण्यात आला?

1. 1947
2. 1948
3. 1949
4. 1950

**Answer:**

**A**

**Sol:**

स्वतंत्र भारताचे पहिले अर्थमंत्री आर.के. षण्मुखम चेट्टी होते. **26** नोव्हेंबर **1947** रोजी त्यांनी भारताचा पहिला केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला. टी. टी. कृष्णमाचारी यांनी **30** नोव्हेंबर **1956** रोजी पहिले मिनी बजेट सादर केले होते.

---

**Q.3**

केंद्रीय अर्थसंकल्प **2023** मध्ये चालू वर्षाच्या आर्थिक वाढीचा अंदाज किती आहे?

1. 4.9%
2. 8.1%
3. 7.3%
4. 6.2%

**Answer:**

**C**

**Sol:**

आपल्या स्वातंत्र्याच्या **75** व्या वर्षी जगाने भारतीय अर्थव्यवस्थेला 'उज्ज्वल तारा' म्हणून ओळखले. आमची चालू वर्षाची आर्थिक वाढ ७ टक्के राहण्याचा अंदाज आहे.

---

**Q.4**

भारतात सर्वात लहान अर्थसंकल्पीय भाषण देण्याचा विक्रम कोणाच्या नावावर आहे?

1. मनमोहन सिंग
2. अरुण जेटली
3. हिरुभाई मुल्जीभाई पटेल
4. जसवंत सिंग

**Answer:**

**C**

**Sol:**

सर्वात लहान अर्थसंकल्पीय भाषण माजी अर्थमंत्री हिरुभाई मुल्जीभाई पटेल यांनी केले. पटेल यांनी **1977** मध्ये **800** शब्दांचा अंतरिम अर्थसंकल्प सादर केला.
**1977** ते **1979** पर्यंत त्यांनी अर्थमंत्री आणि नंतर भारताचे गृहमंत्री म्हणून काम केले.

---

**Q.5**

भारत सरकार दरवर्षी सादर करत असलेल्या अर्थसंकल्पात खालीलपैकी कोणते आकडे पाहता येतात?

**1.** मागील वर्षाची वास्तविक आकडेवारी.

**2.** चालू वर्षाची वास्तविक आकडेवारी.

**3.** चालू वर्षाची सुधारित आकडेवारी.

**4.** पुढील वर्षासाठी अर्थसंकल्पीय अंदाज.

खाली दिलेल्या पर्यायांचा वापर करून योग्य उत्तर निवडा.

1. फक्त **1, 2** आणि **3**
2. फक्त **1, 3** आणि **4**
3. फक्त **2** आणि **4**
4. फक्त **1** आणि **3**

**Answer:**

**B**

**Sol:**

भारत सरकारचा कोणत्याही वर्षाचा अर्थसंकल्प मागील दोन वर्षांच्या अर्थसंकल्पीय आकडेवारीच्या आधारे त्या वर्षातील सरकारच्या अंदाजे प्राप्ती आणि खर्चाचे संपूर्ण चित्र देतो.
प्रत्येक बजेट, उदाहरणार्थ, आकृत्यांचे तीन संच देते:
• मागील वर्षाचे वास्तविक आकडे
• चालू वर्षासाठी अर्थसंकल्प आणि सुधारित आकडे
• पुढील वर्षासाठी अर्थसंकल्पीय अंदाज

**Q.1**

महाराष्ट्रातील गोदावरी व भीमा या नद्यांचा जलविभाजक कोणती पर्वतरांग आहे **?**

1. सातपुडा पर्वतरांग
2. शंभू महादेव पर्वतरांग
3. सातमाळा -अजिंठा पर्वतरांग
4. हरिशचंद्र -बालाघाट पर्वतरांग

**Answer:**

**D**

**Sol:**

हरिशचंद्र -बालाघाट रांगा : या रांगांमुळे गोदावरी व भीमा खोरी वेगळी झाली आहेत. हरिश्चंद्र रांगा प्रामुख्याने अहमदनगर जिल्ह्यात पसरल्या आहेत. बालाघाट डोंगररांगा अहमदनगर, परभणी, बीड व नांदेड या जिल्ह्यात विस्तारल्या आहेत.

---

**Q.2**

खालीलपैकी कृष्णा नदीच्या उपनद्या कोणत्या आहेत?

**1.** कोयना

**2.**वेरला

**3.**पंचगंगा

**4.**वेण्णा

1. **1** आणि **3**
2. **2, 3** आणि **4**
3. **1, 2** आणि **3**
4. **1, 2, 3** आणि **4**

**Answer:**

**D**

**Sol:**

कृष्णा नदीच्या उपनद्या - कोयना, पंचगंगा, घटप्रभा नदी, मालप्रभा नदी, भीमा नदी, तुंगभद्रा नदी आणि मुसी नदी, दूधगंगा, वेदगंगा, घटप्रभा, ताम्रपर्णी

---

**Q.3**

खालीलपैकी कोणते / कोणती विधान / विधाने बरोबर आहे?

**1.** उत्तर भारतीय पठारी प्रदेश व दक्षिण भारतीय पठारी प्रदेश या दोन प्रादेशिक विभागाचा समावेश होतो.

**2.** दक्षिण भारतीय पठारी प्रदेशातील एक पठार म्हणजे महाराष्ट्र पठार होय. या पठाराची भूमी ही प्राचीन गोंडवानाची भूमी आहे.

1. फक्त **1** बरोबर
2. फक्त **2** बरोबर
3. दोन्ही **1** आणि **2** चूक
4. दोन्ही **1** आणि **2** बरोबर

**Answer:**

**D**

**Sol:**

• हिमालयात उगम पावणाऱ्या नद्यांनी खाली मैदानात येतांना आपल्यासोबत बराच गाळ वाहून आणला. या गाळापासून भारतातील उत्तर भारतीय मैदानी प्रदेशाची निर्मिती झाली.
• उत्तर भारतीय मैदानी प्रदेशाच्या दक्षिणेपासून (यमुना नदीच्या दक्षिणेला असणाऱ्या राजमहाल टेकड्या) भारतीय द्वीपकल्प पठारी प्रदेशाला सुरुवात होते.
• उत्तर भारतीय पठारी प्रदेश व दक्षिण भारतीय पठारी प्रदेश या दोन प्रादेशिक विभागाचा समावेश होतो.
• दक्षिण भारतीय पठारी प्रदेशातील एक पठार म्हणजे महाराष्ट्र पठार होय. या पठाराची भूमी ही प्राचीन गोंडवानाची भूमी आहे.

---

**Q.4**

सातमाळा डोंगर रांगेबद्दल खालील विधाने विचारात घ्या.

**1.**सातमाळा अजिंठा डोंगररांग ही सह्याद्री पर्वताची पश्चिमेकडे जाणारी प्रमुख उपरांग आहे.

**2.** नाशिक जिल्ह्यात या रांगेला सातमाळची डोंगररांग म्हणून, तर पुढे औरंगाबाद जिल्ह्यात अजिंठ्याची डोंगररांग असे म्हणतात.

**3.** नाशिक जिल्ह्यात सातमाळ डोंगर रांगेवर सप्तशृंगी देवीचे मंदिर आहे.

वरीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?

1. फक्त **1**
2. फक्त **2**
3. फक्त **3**
4. **1, 2** आणि **3**

**Answer:**

**A**

**Sol:**

• सातमाळा अजिंठा डोंगररांग ही सह्याद्री पर्वताची पूर्वेकडे जाणारी प्रमुख उपरांग आहे.
• सह्याद्री मधील नाशिक जिल्ह्यातील शिखरापासून पूर्वेकडे यवतमाळ जिल्हा पर्यंत विस्तार आहे.
• नाशिक जिल्ह्यात या रांगेला सातमाळची डोंगररांग म्हणून, तर पुढे औरंगाबाद जिल्ह्यात अजिंठ्याची डोंगररांग असे म्हणतात.
• या डोंगररांगेची उंची पूर्वेकडे कमी होत जाते.
• या डोंगररांगेने उत्तरेकडील तापी या पश्चिम वाहिनी व दक्षिणेकडील गोदावरी या पूर्ववाहिनी नद्यांची खोरी वेगवेगळी केलेली आहेत.
• नाशिक जिल्ह्यात सातमाळ डोंगर रांगेवर सप्तशृंगी देवीचे मंदिर आहे.
• औरंगाबाद जिल्ह्यातील अजिंठा डोंगररांगेवर जगातील सुप्रसिद्ध अजिंठा लेणी व वेरुळ लेणी आहेत.
• अजिंठा डोंगररांगेच्या पूर्वेला दोन शाखा होतात.
• दक्षिणेकडील नांदेड जिल्ह्यातून जाणारी निर्मल डोंगररांग व दुसरी उत्तरेला यवतमाळ जिल्ह्यातून जाणारी अजिंठा डोंगररांग.

---

**Q.5**

उत्तर कोकणात तांदळाचे हेक्टरी उत्पादन जास्त का होते?

1. उष्ण आणि दमट हवामान
2. जास्त पाऊस

3. चिकणमातीयुक्त आणि पाणी धरून ठेवणारी मृदा
4. यापैकी सर्व

**Answer:**

**C**

**Sol:**

उत्तर कोकणात मृदा चिकणमातीयुक्त आणि पाणी धरून ठेवणारी असल्यामुळे तांदळाचे हेक्टरी उत्पादन जास्त होते. दक्षिण कोकणात लॅटेराईट आणि गाळाच्या मृदेमध्ये तांदूळ उत्पादन घेतले जाते, परंतु उत्पादन कमी होते.

**Q.1**

मुस्लिम लीगसंबंधी खालीलपैकी असत्य असलेले विधान कोणते?

1. मुस्लिम शिक्षण परिषदेच्या विसाव्या अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी मुस्लिम लीगची स्थापना करण्यात आली.
2. लीगची घटना मौलाना मोहम्मद अली गौहर यांनी तयार केली.
3. नवाब सलीमुल्ला हे लीगच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते.
4. मोहम्मद अली जीना यांनी **1913** साली मुस्लिम लीगमध्ये प्रवेश केला.

**Answer:**

**C**

**Sol:**

• मुस्लिम लीग : (**1906**, ढाका)
• आगाखान यांच्या नेतृत्वाखाली **35** सदस्यांचे शिष्टमंडळ शिमला येथे गेले.
• मोहमेडन अँग्लो ओरिएंटल कॉलेजचे प्राचार्य आर्क बोल्ड यांच्या मदतीने मुस्लिम स्वतंत्र मतदार संघाची मागणी भारतमंत्री मोर्लेकडे केली.
• नवाब सलीमुल्ला हे लीगच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते.
• प्रस्ताव : ढाक्याचा नवाब सलीमुल्ला
• अध्यक्ष : हाकिम अजमल खान, मोलाना मोहम्मद अली
• सचिव : नवाब वकार – उल-मुल्क
• पहिले वार्षिक अधिवेशन : **29, 30** डिसेंबर **1907** (अध्यक्ष : अदमजी पीरभॉय)
• मुख्यालय : लखनौ

---

**Q.2**

अचूक कालानुक्रम लावा.

अ) गदर पार्टीची स्थापना ब) चौरीचौरा घटना

क) खुदीराम बोसची फाशी ड) मलबारमध्ये मोपला बंड

1. अ, ब, क, ड
2. ब, अ, ड, क
3. क, ड, अ, ब
4. क, अ, ड, ब

**Answer:**

**D**

**Sol:**

| अ क्र | घटना | दिनांक |
|---|---|---|
| 1 | खुदीराम बोसची फाशी | 1908 |
| 2 | गदर पार्टीची स्थापना | 1913 |
| 3 | मलबारमध्ये मोपला बंड | 1921-22 |
| 4 | चौरी – चौरा घटना | 4 फेब्रुवारी 1922 |

---

**Q.3**

पंडिता रमाबाई बद्दल कोणती विधाने बरोबर आहेत?

अ) त्या संस्कृत भाषेत निष्णात होत्या.

ब) त्या वेदांवर प्रवचन देत.

क) त्यांनी ख्रिश्चन धर्म स्विकारला होता.

1. अ

2. अ, ब
3. अ, ब, क
4. कोणतेही नाही

**Answer:**

**C**

**Sol:**

• पंडिता रमाबाई –
• जन्म - **23** एप्रिल **1858**
• रमाबाईंनी **30** स्पटेंबर **1883** रोजी ख्रिश्चन धर्म स्विकारला.
• **1882** साली हंटर कमिशनसमोर साक्ष दिली.

---

**Q.4**

खालीलपैकी कोणती घटना राष्ट्रीय सभेच्या 'सुरत अधिवेशन' (1907) शी संबंधित नाही?

1. याच अधिवेशनात राष्ट्रीय सभेअंतर्गत काँग्रेस व मुस्लिम लीग यांच्यात फूट पडली.
2. या अधिवेशनाचे अध्यक्ष रासबिहारी घोष हे होते.
3. या अधिवेशनानंतर एलन ह्यूम यांनी राष्ट्रीय सभेचे सचिव पद सोडले.
4. या अधिवेशनानंतर राष्ट्रीय सभेचे नेतृत्व फिरोजशहा मेहता, गोपाळ कृष्ण गोखले, पंडित मदन मोहन मालवीय, सुरेंद्रनाथ बॅनर्जी या मवाळवादी नेत्यांकडे आले.

**Answer:**

**A**

**Sol:**

• **1905** मधील वंगभंग चळवळ व त्याचेच पुढील रूप म्हणजेच स्वदेशी चळवळ यामुळे राष्ट्रीय राजकारणात लाल-बाल-पाल व घोष या जगाला नेत्यांना मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळाला.
• **1905** च्या बनारस अधिवेशनानंतर राष्ट्रीय सभेअंतर्गत मवाळ व जहाल यांच्यामध्ये अनेक मुद्द्यांवर प्रचंड मतभेद निर्माण झाले होते.
• **1906** च्या कलकत्ता अधिवेशनाचे अध्यक्षपद दादाभाई नौरोजी यासारख्या जेष्ठ नेत्याकडे असल्याने जहाल व मवाळ नेते शांत राहिले.
• परंतु **1907** च्या सुरत अधिवेशनामध्ये त्यांच्यातील मतभेद प्रचंड विकोपाला जाऊन राष्ट्रीय सभे अंतर्गत जहाल व मवाळांमध्ये फुट पडली.
• या अधिवेशनानंतरच राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपासून राष्ट्रीय सभेचे सचिव असणारे एलन ह्यूम यांनी सचिव पदाचा राजीनामा दिला.

---

**Q.5**

सशस्त्र क्रांतीकारकांच्या व त्यांच्या कारवायांच्या क्षेत्राच्या जोड्या जुळवा.

स्तंभ अ स्तंभ ब

अ) श्रीधर परांजपे **i)** हैद्राबाद

ब) डॉ. सिद्धनाथ काणे **ii)** अमरावती

क) दादासाहेब खापर्डे **iii)** यवतमाळ

ड) नरहरिपंत घारपुरे **iv)** वर्धा, नागपूर

अ) ब) क) ड)

1. **iv iii i ii**
2. **iv iii ii i**
3. **i ii iii iv**
4. **ii i iv iii**

**Answer:**

**B**

**Sol:**

| क्रांतीकारक | क्षेत्र |
| --- | --- |
| श्रीधर परांजपे | वर्धा, नागपूर |
| डॉ. सिद्धनाथ काणे | यवतमाळ |
| दादासाहेब खापर्डे | अमरावती |
| नरहरिपंत घारपुरे | हैद्राबाद |

**Q.1**

खालीलपैकी कोणती राष्ट्रीय उत्पन्नाची अंदाज पध्दती नाही ?

अ) उत्पादन पध्दती ब) आयात – निर्यात पध्दती

क) उत्पन्न पध्दती ड) खर्च पध्दती

1. अ आणि ब
2. क आणि ड
3. फक्त ब
4. फक्त ड

**Answer:**

**C**

**Sol:**

• राष्ट्रीय उत्पन्न मोजमाप पध्दती
1. उत्पादन पध्दती
2. उत्पन्न पध्दती
3. खर्च पध्दती

---

**Q.2**

खालीलपैकी कोणते विधान / विधाने बरोबर आहेत ?

अ) राज्यात मुंबई (शहर व उपनगर), ठाणे आणि पुणे यावर जिल्ह्यांत मानव विकास निर्देशांक 0.8 पेक्षा जास्त.

ब) राज्यात 0.5 पेक्षा कमी मानव विकास निर्देशांक असलेले जिल्हे हे मुख्यत: राज्याच्या पुर्व विभागात व उत्तरेकडील नंदूरबार व धुळे आहे आहेत.

1. अ आणि ब बरोबर
2. अ बरोबर ब चूक
3. अ चूक ब बरोबर
4. अ आणि ब चूक

**Answer:**

**D**

**Sol:**

जिल्हे
मानव विकास निर्देशांक
मुंबई (शहर व उपनगर) आणि ठाणे
0.8% पेक्षा जास्त
पुणे, रायगड आणि नागपुर
0.7 ते 0.8% च्या दरम्यान
मुख्यत: राज्याच्या पुर्व भागातील जिल्हे आणि धुळे, रत्नागिरी, सोलापुर (36 पैकी 20 जिल्हे 0.5 पेक्षा कमी)
0.5% पेक्षा कमी
नंदूरबार, जालना, यवतमाळ, गडचिरोली
0.2 ते 0.3% च्या दरम्यान

---

**Q.3**

अ) पैशाचा संख्यात्मक सिद्धांत भाववाढीला पैशाचा पुरवठा जबाबदार असल्याचे मानतो.

ब) या सिद्धांतात पैशाचा पुरवठा M या अक्षराने दर्शवतात.

1. फक्त अ बरोबर
2. दोन्ही बरोबर
3. फक्त ब बरोबर
4. दोन्ही चूक

**Answer:**

**B**

**Sol:**

• पैशाचा संख्यात्मक सिद्धांत- आयर्विंग फिशर **MV = PT**
• **V & T** स्थिर मानल्यास **M = P**
• **P =** किंमती, **M=** पैशाचा पुरवठा
• **V =** पैशाचा वेग, **T =** व्यवहारांची संख्या

---

**Q.4**

जागतिकीकरणाचे भारतातील पुढील टप्पे कालानुक्रमे लावा-

अ) रूपयांची परिवर्तनियता

ब) रूपयोच अवमूल्यन

क) स्वामित्वहक्क(सुधारणा) कायद्यांस मंजूरी

1. ब, अ, क
2. क, अ, ब
3. ब, क, अ
4. क, ब, अ

**Answer:**

**A**

**Sol:**

• भारतातील जागतिकीकरणाचे टप्पे :
सन **1991** पर्यंत भारताने तीन वेळा रूपयाचे अवमूल्यन घडवून आणले आहे. (प्रथम **1949** मध्ये)
ऑगस्ट **1994** मध्ये रूपया चालू खात्यावर पूर्णपणे परिवर्तनीय करण्यात आला.
**2005** च्या सुधारणेद्वारे भारताने प्रक्रिया ऐवजी उत्पादन पेटंटचा स्वीकार केला आहे.

---

**Q.5**

खालीलपैकी कोणते भारतातील लोकसंख्या विस्फोटाचे कारण नाही ?

अ) निरक्षरता ब) विवाहाची सार्वत्रिकता

क) एकत्र कुटुंब पध्दती ड) राहणीमानातील सुधारणा

1. अ आणि ब
2. क आणि ड
3. अ, ब, क
4. फक्त ड

**Answer:**

**D**

**Sol:**

• ग्रामीण भागात बेरोजगारीचे प्रमाण जास्त असल्यामुळे लोक शहराकडे स्थलांतर करत आहेत. अर्थात त्यांच्या राहणीमानात सुधारणा होत आहे असे म्हणण्याचे हरकत नाही. त्यामुळे लोकसंख्येलाच आळा बसत आहे.
• ग्रामीण भागातील गरिबी, शेतीचे शेतीचे प्राबल्या हे उच्च जननदरास कारणीभूत आहे. तसेच निरक्षरता, एकत्र कुटुंब पध्दती आणि विवाहाची सार्वजनिकता सुध्दा लोकसंख्येच्या विस्फोटास कारणीभूत आहे.

---